ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २३ | पुणें, बुधवार तारीख १० जुलै, १९५७ | अंक १८

## विविध माहिती

**छोट्या उद्योगधंद्यांसाठी वर्कशॉप**— भारत सरकारनें छोट्या उद्योगधंद्यांना उपयोगी पडेल अशा प्रकारचें एक वर्कशॉप दिल्लीजवळ काढण्याचें ठरविलें आहे. ह्या वर्कशॉपमध्यें छोट्या उद्योगधंद्यांना लागणारी यंत्रसामुग्री तयार करण्यांत येईल व कामगारांना शिक्षण देण्यांत येईल. ह्या कामीं पश्चिम जर्मन सरकारचें तांत्रिक व आर्थिक साह्य घेण्यांत आलें आहे.

**चलनवृद्धीचे विरुद्ध उपाय**—पाकिस्तानच्या स्टेट बँकेनें चलनवृद्धिविरुद्ध उपाय म्हणून बँकांनीं द्यावयाच्या कर्जावर कांहीं नियंत्रणें जाहीर केलीं आहेत. आयात केलेल्या वस्तू, सोनें-चांदी, धान्य व गळिताचीं धान्यें, ह्यांच्या किंमतीच्या ६० टक्क्यांपेक्षा अधिक कर्जें न देण्याच्या सूचना बँकांना देण्यांत आल्या आहेत.

**रशिआचें नवें विमान**—रशिआंतील तंत्रज्ञांनीं एका नव्या विमानाची बांधणी केली असून सध्यां त्याचीं प्रायोगिक उड्डाणें चालूं आहेत. विमानांत ८४ प्रवासी बसण्याची व ३॥ टन वजन नेण्याची सोय करण्यांत आली आहे.

**माजी राजाची मालमत्ता**—दक्षिण व्हिएटनाम राज्याचे माजी राजे बाओ दाय ह्यांची सर्व मालमत्ता ताब्यांत घेण्याचें अधिकार देणारें बिल सध्यांच्या नॅशनल असेंब्लीनें मंजूर केलें. राजेसाहेबांना लोकांनीं कायदेशीर रीत्या पदच्युत केल्यापासून ते फ्रान्समध्यें रहात आहेत.

**भारतासाठी फिरते सिनेमे**—भारतामधील ग्रामीण भागांत उपयोगी पडतील अशा तऱ्हेच्या चार सिनेमाच्या गाड्या रशिआनें तयार केल्या आहेत. सिनेमासाठी लागणारी वीज पुरविण्याची यंत्रसामुग्री गाडींतच बसविण्यांत आली आहे. त्याशिवाय भाषणांसारखे कार्यक्रम प्रक्षेपित करण्यासाठी ध्वनिक्षेपणाचीहि सोय करण्यांत आली आहे.

**भांडवलाच्या गुंतवणुकींत वाढ**—अमेरिका, पश्चिम जर्मनी व ब्रिटन ह्या देशांनीं गेल्या सालीं परदेशांत गुंतविलेल्या भांडवलांत मागील वर्षाच्या मानानें वाढ झालेली आहे, असें संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या ह्यासंबंधीच्या अहवालांत नमूद करण्यांत आलें आहे. गेल्या कांहीं वर्षांत जर्मन भांडवल स्पर्धा करूं लागलेलें आहे.

**हुबळी येथें वैद्यकीय कॉलेज**—प्रांतांची पुनर्रचना झाल्यावर मुंबई राज्याचा कांहीं भाग म्हैसूर राज्यांत घालण्यांत आला. ह्या भागाच्या सोयीसाठी हुबळी येथें एक वैद्यकीय कॉलेज काढण्याचें म्हैसूरच्या सरकारनें ठरविलें आहे. ह्या योजनेला मध्यवर्ती सरकारची मान्यता मिळाली आहे.

**मालवाहू डबे मिळाले**—कोलंबो योजनेप्रमाणें भारताला ऑस्ट्रेलिआकडून १९५८ सालअखेर २,००० मालवाहू रेल्वेचे डबे मिळावयाचे आहेत. त्यांपैकीं ५४० डब्यांचा दुसरा हप्ता मद्रास बंदरांत आला आहे. अरुंद रुळावर चालणाऱ्या सदर्न रेल्वे मार्गावर ते वापरण्यांत येणार आहेत.

**नेपाळला तांदुळाचा पुरवठा**—नेपाळमधील तांदुळाच्या सांठ्याची परिस्थिति चिंताजनक झाल्यामुळें, मदत म्हणून भारत सरकारनें नेपाळला १,००० टन तांदूळ तावडतोब पुरविण्याचें ठरविलें आहे. नेपाळ सरकारनें भारत सरकारकडे २,००,००० टन तांदूळ पुरविण्याविषयीं विनंती केली आहे.

**ब्रिटनच्या मदतीचा संभव**—भारताच्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेसाठी ब्रिटनकडून मिळूं शकणाऱ्या मदतीविषयीं 'फिनॅन्शिअल टाइम्स' ह्या दैनिकानें असें म्हटलें आहे कीं भारताकडून २० कोटी पौंडांचें कर्ज मागविण्यांत येण्याचा संभव आहे. पण इतकी रक्कम देणें ब्रिटनला शक्य होईल असें त्याला वाटत नाहीं.

**अमेरिकेचें व्यापारी धोरण**—पूर्व युरोपांतील कम्युनिस्ट देशांशीं व्यापार करण्याबाबत अमेरिकेचें धोरण थोडेंबहुत लवचिक होण्याची शक्यता आहे. पण चीन व उत्तर कोरिआ ह्यांच्याशीं करावयाच्या व्यापारावरील निर्बंध मात्र अमेरिका शिथिल करणार नाहीं असें समजतें.

**सीलोनचें अंदाजपत्रक**—सीलोनच्या सरकारचें आर्थिक वर्ष १ ऑक्टोबरपासून सुरू होतें. येत्या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकाची तोंडमिळवणी करण्यासाठी सीलोनच्या सरकारला २० कोटी रुपये ह्या, ना त्या, मार्गांनीं उभे करावे लागतील असें आढळून आलें आहे.

**भारतीय नागरिकांची परत पाठवणी**—१९५६ सालांत सिलोनमधून १५,८८९ हिंदी नागरिकांना सक्तीनें भारतांत परत पाठविण्यांत आलें. त्यामुळें सिलोनच्या १६,००० नागरिकांना रोजगार मिळाला असावा असा अंदाज करण्यांत आला आहे. १८,००० हिंदी नागरिकांना सीलोन सोडून जाण्याविषयीं नोटिसा देण्यांत आल्या होत्या.

**बेकार तंत्रज्ञांना पुन्हां नोकऱ्या**—दामोदर व्हॅली कॉर्पोरेशनमध्यें कामावर असलेल्या २,७०८ तंत्रज्ञांना कामावरून कमी करण्यांत आलें होतें. १९५७च्या एप्रिल अखेर त्यांपैकीं १,८७२ लोकांना नवा रोजगार देण्यांत आला. आणखी ९१ जणांना लौकरच नवी नोकरी देण्यांत येईल. ५६० नोकरांनीं कामावरून काढल्याबद्दल नुकसानभरपाई घेऊन रस्ता सुधारला.

## नकलाकार भोंडे—व्यक्ति आणि कला

( लेखक :—वा. कृ. परांजपे, बी. ए., एलएल. बी. प्रकाशक :—र. पां. भोंडे, बी. ए., एलएल. बी., २८ बुधवार, पुणें २. मूल्य :—२ रुपये, ८० नये पैसे )

महाराष्ट्रांतील निरनिराळ्या वैशिष्ट्यपूर्ण कलांच्या क्षेत्रांत ज्यांनीं आपल्या अपूर्व गुणांचा ठसा कायमचा उठविला आहे त्यांत नकलाकार श्री. गोपाळराव तथा अप्पासाहेब भोंडे यांचा निर्देश आवर्जून करावा लागेल. त्यांनीं आपल्या अपूर्व अभिनय-गुणांनीं महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध राष्ट्रीय पुढाऱ्यांचें व समाजांतील चमकदार व्यक्तिमत्व असलेल्यांचें जें व्यक्तिदर्शन आज गेलीं ४० वर्षें घडविलें आहे, तें अत्यंत रमणीय असें आहे. श्री. गोपाळराव भोंडे यांच्या अंगीं असलेल्या या अभिजात कलेचा सुंदर शब्दरूप आविष्कार श्री. वामनराव परांजपे यांनीं या पुस्तकांत केला आहे. श्री. गोपाळराव भोंडे यांचा थोडक्यांत जीवन-वृत्तांत देऊन, लहानपणापासूनच त्यांच्या अंगीं असलेल्या नकला करण्याच्या कलेचा परिपोष कसा होत गेला, हें लेखकानें मार्मिक रीतीनें दाखविलें आहे.

या पुस्तकांतील कलादर्शन हें तिसरें प्रकरण अत्यंत बहारीचें उतरलें आहे. श्री. गोपाळरावांच्या नकलांचें विविध गुणवर्णन करण्यांत लेखकाच्या वाङ्मयशैलीचेहि निरनिराळे पैलू आपल्या नजरेस येतात. श्री. गोपाळराव भोंडे हे आपल्या नकलांतून ज्या-प्रमाणें निरनिराळ्या माणसांचें आपल्या पुढें जणूं काय प्रत्यक्ष दर्शन घडवितात त्याचप्रमाणें लेखकानेंहि आपल्या मोहक व लालित्यपूर्ण भाषाशैलीनें नकलाकार भोंडे यांचें कलापूर्ण दर्शन घडविलें आहे. श्री. गोपाळराव भोंडे करीत असलेल्या निरनिराळ्या नकलांचें सविस्तर वर्णन लेखकानें अत्यंत मार्मिकतेनें व सहृदयतेनें केलें आहे. श्री. गोपाळराव भोंडे यांच्या नकला पाहण्यांत जो आनंद व समाधान लाभतें व करमणूक होते तितकाच आनंद, समाधान व करमणूक लेखकानें सदरील पुस्तक लिहिण्यांत जें वाग्वैभव प्रगट केलें आहे तें पाहून होतें. मराठी ललित वाङ्मयांत व चरित्र-वाङ्मयांत या पुस्तकानें चांगली भर पडली आहे. नकलाकारांचे कर्तबगार बंधु श्री. नानासाहेब भोंडे, बी. ए., एलएल. बी. वकील, ह्यांच्या प्रदीर्घ सार्वजनिक व व्यावसायिक कामगिरीचें यथार्थ दर्शन घडविणारें प्रकरणहि उद्बोधक झालें आहे; त्यावरून श्री. नानासाहेबांच्या कर्तृत्वाची व कार्याची एकत्र माहिती मिळते.

---

## नासिक डि. सें. को. बँकेची मालेगांव शाखा

नासिक डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या बाराव्या शाखेचा उद्घाटनसमारंभ श्री. भाऊसाहेब हिरे, एम्. एल. ए. यांचे हस्तें मालेगांव येथें सोमवार दि. १–७–५७ रोजीं पार पडला. सकाळीं विधिपुरःसर शाखेच्या वह्यांचें पूजन झालें. सायंकाळीं काकाणी चित्रमंदिरांत झालेल्या सभेस सातशेंच्या वर तालुक्यांतील मंडळी उपस्थित होती. त्याच दिवशीं बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँकेनें आपल्या शाखेचा व्यवहार नासिक जिल्हा बँकेकडे वर्ग केला. जिल्हा बँकेची २६–१–५५ रोजीं स्थापना झाली, तेव्हांपासून दोन अडीच वर्षांत तिनें चांगली प्रगति केली आहे. बँकेचें शेअर भांडवल रु. नऊ लाखांचे वर असून तिच्या ठेवी रु. पंचावन लाखांपर्यंत गेल्या आहेत. बँकेचें खेळतें भांडवल जवळजवळ नव्वद लाखांचें आहे. मालेगांव येथें शाखा उघ-डल्यानें आतां बँकेचें कार्यक्षेत्र संपूर्ण जिल्ह्याचें झालें आहे. सरकारनें बँकेचे चार लाखांचे शेअर्स खरेदी केले आहेत.

## डॉलर्सची प्राप्ति करून देणारे काजू

दुसरी पंचवार्षिक योजना पुरी करण्यासाठी भारताला परदेशी हुंडणावळीची फार गरज आहे. ज्या वस्तू निर्यात करून डॉलर्स मिळूं शकतात अशा वस्तूंत काजू ही एक महत्त्वाची वस्तु आहे. चहा आणि काळीं मिरी ह्यांच्या खालोखाल ह्या बाबतींत काजूचा अनुक्रम लागतो. काजूंचें उत्पादन मुख्यतः भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर होतें. ह्या वस्तूंच्या निर्यातीची मक्तेदारीच भारताकडे आहे असें म्हटल्यास हरकत नाहीं. १९५५–५६ सालांत अमे-रिकेनें भारताकडून १३·५ कोटी डॉलर्स किंमतीच्या काजूंची आयात केली असें आढळून आलें आहे. ह्या निर्यातींत काजू आणि त्याच्या कवचापासून निर्माण केलेलें तेल ह्यांचा समावेश होतो. काजूंच्या कवचापासून तयार करण्यांत आलेल्या तेलाचा उपयोग अमेरिकेंतील रंगाचे व व्हार्निशचे कारखाने करतात. भारताच्या काजूंच्या एकूण निर्यातीपैकीं ७० टक्के निर्यात ब्रिटन व अमेरिका ह्या देशांना करण्यांत येते. सर्व जगांत इतर कोणत्याहि देशापेक्षा भारतांत काजूंचें उत्पादन अधिक होतें. भारतामधील काजूंचें वार्षिक उत्पादन सुमारें ६०,००० टन असावें असा अंदाज आहे. काजूंच्या आंतरराष्ट्रीय व्यापारांत त्यामुळें भारताचें स्थान महत्त्वाचें आहे. काजू व त्याच्या कवचापासून केलेलें तेल ह्यांच्या व्यापारापैकीं ९० टक्के व्यापारा-वर भारताचें नियंत्रण आहे. पण भारतांतील काजूंचे कारखाने चालू ठेवण्यासाठी पूर्व आफ्रिकेमधून मोठ्या प्रमाणावर काजूंची आयात करावी लागते. काजूंचें उत्पादन ६०,००० टनांवरून १,०६,००० टनांपर्यंत वाढविण्यासाठी योजना आंखण्यांत आल्या आहेत.

---

## सागरी वहातुकीसाठी अधिक बोटी

भारताच्या व्यापारी बोटींच्या संख्येंत भर घालण्यासाठी मध्यवर्ती सरकार दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत ठरविल्यापेक्षा अधिक रक्कम देण्याचा विचार करीत आहे असें समजतें. वाहतूक व दळणवळण खात्याचे मंत्री श्री. लालबहादूर शास्त्री व अर्थमंत्री श्री. कृष्णम्माचारी ह्यांनीं ह्या विषयासंबंधीं चर्चाहि केली आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या कालांत ३,९०,००० टन वजनाचीं नवीं जहाजें व्यापारी बोटींच्या तांड्यांत नव्यानें आणण्याचें उद्दिष्ट ठरविण्यांत आलें आहे. ह्या कामासाठी मंजूर करण्यांत आलेली ३७ कोटी रुपयांची रक्कम नव्या बोटी घेण्यासाठीं खर्च होणार आहे. नव्या बोटींसाठी मंजूर केलेली रक्कम पुरेशी नाहीं ह्याची नियोजन मंडळाला जाणीव आहे व होती. दरम्यान बोटींच्या किंमतीहि वाढल्या आहेत. त्यामुळें ठरविण्यांत आलेलें उद्दिष्ट मंजूर केलेल्या रकमेच्या योगानें गांठणें अधिकच कठीण झालेलें आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील बोटींचें उद्दिष्ट गांठण्यासाठी आणखी ४० कोटी रुपयांची तरतूद करावी लागेल असा अंदाज करण्यांत आला आहे. दुसऱ्या महायुद्धांत वापर-लेल्या 'लिबर्टी' ह्या प्रकारच्या बोटी अमेरिकेनें तबेल्यांत ठेवून दिल्या आहेत. त्या बोटींपैकीं १२ ते २० बोटी मिळविण्याचा प्रयत्न भारत सरकार करीत आहे. ह्या बोटींच्या विक्रीसाठीं अमेरिकेला कायदा करावा लागेल. शिवाय त्यांच्या किंमतीहि भलत्याच मागितल्या जाण्याची शक्यता आहे. अमेरिकन सरकारनें अद्याप किंमती ठरविलेल्या नाहींत.

# अर्थ

बुधवार, ता. १० जुलै, १९५७





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## कर्जें आखडतीं घेण्याचा बँकांना सल्ला

### कडक धोरण स्वीकारण्यास आतांच प्रारंभ करा

रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर श्री. अय्यंगार ह्यांनीं, "बँकांनीं कर्जें आखडतीं घेऊन स्वतःवरील बोजा कमी करावा आणि रिझर्व्ह बँकेवरील अवलंबूनहि कमी करावें" असा बँकांना सल्ला दिला आहे. कर्जें आखडतीं घेण्यास हा समय सोईचा, आहे. "बँकांनीं कर्जाचें ठेवींशीं प्रमाण उतरवावें, पण आवश्यक आर्थिक व्यवहारांची गैरसोय होऊं देऊं नये आणि औद्योगिक उत्पादनाच्या वाढीस अडथळा येण्याचें टाळावें", अशा पद्धतीनें बँकांनीं धोरण ठेवावयाचें आहे. जून, १९५५ मध्यें बँकांनीं दिलेल्या कर्जाची रक्कम ६१३ कोटी रु. होती ती जून, १९५७ अखेर ९३२ कोटी रु. झाली आहे ! ज्या मानानें मोसमांत कर्जवाढ होते, त्या मानानें मे ते ऑक्टोबर ह्या बिगर-मोसमांत कर्जें पुनः कमी होत नाहींत, असा गेल्या कांहीं वर्षांचा अनुभव आहे. १९५५-५६ च्या ह्या बिगर–मोसमाच्या काळांत कर्जें कमी न होतां तीं ६ कोटी रु. नीं उलट वाढलींच ! शेतीविषयक व इतर मालाचे सांठे करून ठेवण्याच्या प्रवृत्ती ह्या घटनेस कांहीं अंशीं कारणीभूत आहे, असें रिझर्व्ह बँकेस वाटतें. कर्जांत होत असलेली वाढ ठेवींतील वाढीपेक्षा जास्त असून, कर्जाचें ठेवींशीं प्रमाण ७५% पर्यंत पोंचलें आहे. कर्जाचे बाबतींत कडक धोरण आतांच ठेवलें नाहीं, तर येत्या हंगामाचे वेळीं परिस्थिति अधिकच बिकट होईल. गेल्या वर्षी भारताच्या स्टर्लिंग शिलकांचा मोठ्या प्रमाणावर वापर केला गेला, त्याचा फायदा बँकांना मिळाला, तो आतां मिळण्याचा संभव नाहीं. म्हणून, प्रत्येक बँकेनें आपल्या ठेवी व कर्जें ह्याविषयक परिस्थिति काळजीपूर्वक तपासून पाहणें आवश्यक झालें आहे.

---

## स्टेट बँकेनें १०२ शाखा उघडल्या; आणखी ४०० शाखा उघडणार

इंपीरिअल बँकेचें राष्ट्रीयीकरण झाल्यानंतर तिचेकडील ठेवी कांहीं कोटी रुपयांनीं घटल्या, पण स्टेट बँकेच्या उज्ज्वल भवितव्याविषयीं जनतेची खात्री पटून स्टेट बँकेकडील ठेवी पुनः वाढल्या आहेत, असें स्टेट बँकेचे चेअरमन, श्री. भट्टाचार्य, ह्यांनीं पत्रकारांच्या बैठकींत सांगितलें. डिसेंबर, १९५४ अखेर बँकेकडे २३१ कोटी रु. च्या ठेवी होत्या, त्या ३० जून, १९५५ रोजीं २११ कोटी रु. वर आल्या. पण ३० जून, १९५७ रोजीं त्या ३१६ कोटी रु. वर गेल्या आहेत. बँकेच्या राष्ट्रीयीकरणाचे वेळीं तिनें ११६ कोटी रु. चीं कर्जें दिलेलीं होतीं; आतां तीं २८३ कोटी रु. झालीं आहेत. ग्रामीण भागांत आणि तालुक्याच्या ठिकाणासारख्या अर्धवट शहरांचे ठिकाणीं बँकिंगचा प्रसार करण्यासाठी व सहकारी आणि इतर बँकांना पैशाच्या वर्गावर्गीच्या सोई उपलब्ध करून देण्यासाठी स्टेट बँक येत्या पांच वर्षांत किमान ४०० नव्या शाखा सुरू करणार आहे; आतांपर्यंत तिनें १०२ नव्या शाखा उघडल्या आहेत. सरकारी रोख्यांचे तारणावर सहकारी बँकांना कर्जें विशेष सवलतींनें दिलीं जातील. लँड मॉर्गेज बँकांचीं डिबेंचर्स घेऊन व त्यांच्या खरेदी–विक्रीला प्रोत्साहन देऊन लँड मॉर्गेज बँकांकरवीं शेतीला दीर्घ मुदतीचा भांडवल पुरवठा अप्रत्यक्ष रीतीनें केला जाईल. लहान आकाराच्या उद्योगधंद्यांच्या विशिष्ट गरजा लक्षांत घेऊन 'पायलट' योजना सुरू करण्यांत आल्या. गेल्या वर्षी ह्या योजनेचा फायदा सांगणारे ५१ अर्ज आले व ३१ मार्च, १९५७ अखेर २३·४८ लक्ष रुपयांचीं कर्जें मंजूर करण्यांत आलीं. रीफिनॅन्स कॉर्पोरेशनमार्फत औद्योगिक विकासाला मदत होईल. ह्या संस्थेच्या १२·५ कोटी रु. भाग भांडवलापैकीं २·५ कोटी रु. भांडवल स्टेट बँकेनें घेतलें आहे. अमेरिकन गव्हाच्या विक्रीचे मिळणारे २६ कोटी रु. ह्या संस्थेला उपलब्ध होतील.

---

## सिलोनमध्यें 'बँक डेबिट्स' वर कर

सिलोनच्या बजेटांत २० कोटी रुपयांची तूट आहे. ती भरून काढण्यासाठी कांहीं नवे कर बसाविण्यांत येणार आहेत, त्यांत 'बँक डेबिट्स' वरील कर आहे. व्यापारी बँकांतील करंट खात्यावरील प्रत्येक 'डेबिट्' बाबीवर १०० रु. ला एक दशांश रुपया ह्या दरानें कर घेतला जाईल. म्हणजे, १००० रुपये नांवे लिहिले कीं, १ रु. कर पडेल. व्यापारी बँकांनीं हा कर जमा करून सरकारला भरावयाचा आहे. बँकिंगच्या प्रसारास ह्यानें आडकाठी येईल. ही तक्रार अर्थमंत्र्यांना मान्य नाहीं. "ज्याच्या खात्याची मासिक उलाढाल १ लक्ष रुपये आहे, तो दरमहा फक्त १०० रुपये कर देईल. ही आकारणी योग्य व बेताची आहे आणि ती कोणत्याहि तत्त्वास सोडून नाहीं" असें त्यांनीं विधिमंडळांत सांगितलें. हिंदी अर्थमंत्री ह्या कराचें शुभचिंतन करीत असतील. कारण, सीलोनमधील त्याचा प्रयोग यशस्वी झाला, तर भारतांतहि तो सुरू करतां येईल !

---

## टेलिव्हिजनची प्रगति

ग्रेट ब्रिटनमध्यें टेलिव्हिजनच्या लायसेन्सची संख्या ७०,००,००० झाली आहे. १९५७ च्या पहिल्या तिमाहींत लायसेन्सची संख्या ४,००,००० नीं वाढली. वेल्स, स्कॉटलंड व उत्तर आयर्लंड ह्यांचे मानानें इंग्लंडमध्यें टेलिव्हिजन जास्त लोकप्रिय आहे. टेलिव्हिजनचा जाहिरातींसाठी अधिकाधिक उपयोग केला जात आहे.

---

## प्रवाशांपासून प्राप्ति

ग्रेट ब्रिटनमध्यें १९५७ सालीं एकूण ११,०७,००० परदेशी प्रवासी गेले. १९५६ चे मानानें ही संख्या ७% जास्त आहे. प्रवाशांपैकी २,५५,००० अमेरिकन होते. ह्या प्रवाशांमुळें ग्रेट ब्रिटनला ४३० लक्ष पौंड डॉलर्सच्या हुंडणावळींत मिळाले.

## कंपनी कायद्यांतील पळवाटा बंद करण्यांत येणार

दुरुस्त कंपनी कायद्याच्या अंमलबजावणीचे वेळीं आढळलेल्या पळवाटा बंद कशा कराव्यात, ह्याविषयीं सरकार विचार करीत आहे. कंपनी कायद्याचा उद्देश अधिक चांगला सफल कसा होईल, ह्याचा विचार करण्यासाठीं सरकारनें मद्रास हायकोर्टाचे माजी न्यायाधीश, श्री. विश्वनाथशास्त्री, ह्यांच्या अध्यक्षतेखालीं एक कमिटी नेमलेली आहे. तिचा रिपोर्ट सप्टेंबरमध्यें हातीं येईल अशी अपेक्षा आहे. त्यानंतर ह्याबाबत प्रत्यक्ष तरतुदींचा विचार केला जाईल.

### दुरुस्तीचा उद्देश

दुरुस्त कंपनी कायदा १ एप्रिल १९५६ रोजीं अंमलांत आला. कंपन्यांच्या कारभारांत सुधारणा व्हावी व भागदारांच्या हक्कांचें संरक्षण व्हावें, हा त्याचा एक उद्देश आहे. पब्लिक कंपनीच्या मॅनेजिंग एजन्सीचें कमिशन वार्षिक निव्वळ नफ्याच्या १०% पेक्षा ज्यास्त असूं नये अशी त्यांत तरतूद आहे. मॅनेजिंग एजन्सी एकाकडून दुसऱ्याकडे वर्ग होतांना पाळलीं जावयाचीं तंत्रेंहि त्यांत नमूद आहेत.

### प्रायव्हेट कंपन्यांच्या सवलतींचा गैरफायदा

पब्लिक व प्रायव्हेट कंपन्यांतील कांहीं अनिष्ट भेद आतां निदर्शनास आले आहेत. पब्लिक लिमिटेड कंपनीच्या मॅनेजिंग एजन्सीच्या कमिशनवर १०% चें बंधन आहे तसें प्रायव्हेट लिमिटेड कंपनीच्या मॅनेजिंग एजन्सी कमिशनवर नाहीं. प्रायव्हेट कंपन्यांना मुद्दामच ज्यास्त सवलती देण्यांत आल्या होत्या; कारण त्या कंपन्यांत कुटुंबीयांचाच मुख्यतः भरणा असतो व त्यांना पब्लिक कंपनीचा कायदा लागू केल्यानें तें त्रासदायक होईल ही कल्पना. परंतु ह्या सवलतीचा फायदा घेऊन, कंपनी काढतांनाच मुळीं ती प्रायव्हेट कंपनी करण्याकडे संस्थापकांचा कल वाढत चालला आहे. त्याचप्रमाणें, नव्यानें निघणाऱ्या प्रायव्हेट कंपन्यांच्या भागदारांत व्यक्तींपेक्षा कंपन्यांचाच भरणा अधिकाधिक होऊं लागला आहे.

### मॅ. एजंटांचे खंडकरी

मॅनेजिंग एजन्सी कमिशनवरील बंधनें टाळण्यासाठीं, कांहीं मॅनेजिंग एजंटांनीं आपले मॅनेजिंग एजन्सीचे अधिकार इतरांना खंडानें देण्यास प्रारंभ केला आहे. कायद्यांत सांगितलेल्या व्याख्येंत हे खंडकरी मॅनेजिंग एजंट ठरत नाहींत, असें त्यांचें म्हणणें आहे. कांहींनीं मॅनेजिंग एजन्सी सोडली आहे. पण सेलिंग एजन्सी पत्करली आहे. कारण सेलिंग एजन्सीच्या कमिशनवर कायद्यांचें नियंत्रण घातलेलें नाहीं.

### 'कॉर्नरिंग'

कंपन्यांचे शेअर्स एका हातीं एकवटून, त्यांच्या व्यवस्थेचीं सूत्रें बळकावण्याचे प्रयत्नांस कायदा प्रतिबंध करूं शकत नाहीं. पण आतां पैशाचा बाजारांत तुटवडा असल्यानें व शेअर्सचे तारणावर बँकांनीं द्यावयाच्या कर्जावर नियंत्रणें असल्यानें 'कॉनरिंग'चे प्रकार फारसे दिसून येत नाहींत. कांहीं कंपन्यांची मॅनेजिंग एजन्सी बदलली, तर तें कंपन्यांच्या हिताचेंच होतें. म्हणून, सर्वच वर्गावर्गी थांबविण्याचा सरकारचा उद्देश नाहीं. सट्टेबाज लोकांच्या कारवायांना मात्र आळा घातला जावा, ह्या दृष्टीनें प्रयत्न आहे.

## खाजगी मालकीच्या विभागाचें कर्तव्य

भारताचे नियोजनमंत्री श्री. गुलझारीलाल नंदा कलकत्ता येथें गेले असतांना दुसऱ्या पंचवार्षिक योजनेविषयीं त्यांनीं पत्रकारांना मुलाखत दिली. ते म्हणाले कीं, देशांतर्गत पैशाची टंचाई, परदेशी हुंडणावळीचा तुटवडा, उद्योगधंद्यांचें वाजवीकरण, बंदरांतील गर्दी, अशा प्रकारच्या अडचणींमुळें पंचवार्षिक योजनेच्या अंमलबजावणीच्या कामीं संकटें उभीं राहतील असें मानण्याचें कारण नाहीं. ह्या सर्व अडचणींचा अर्थ इतकाच आहे कीं, योजनेच्या यशासाठीं सूत्रबद्ध प्रयत्न करण्यांत आले पाहिजेत. खाजगी मालकीचा विभाग आणि सार्वजनिक मालकीचा विभाग ह्यांच्या गुणदोषांचा विचार करण्याचें सरकारला कारण नाहीं. सरकारला कामगिरी करून दाखवावयाची आहे; आणि ह्या कामगिरीचें स्वरूप उघड आहे:—अधिक लोकांना रोजगार मिळणें, कामगारांना अधिक वेतन मिळणें, उत्पादन वाढणें, राष्ट्रीय उत्पन्नांत वाढ होणें. सामाजिक न्यायाची प्रस्थापना होणें ह्या स्वरूपांत ही कामगिरी प्रकट झाली पाहिजे. नियोजित आर्थिक व्यवस्था गृहीत धरून खाजगी उद्योगधंद्यांच्या विभागानें आपलें काम करावें. जे कारखाने आर्थिक दृष्ट्या न परवडणारे असे असतील त्यांचा विचार करतांना उत्पादन वाढविण्याच्या दृष्टीनेंच सरकारला धोरण ठरवावें लागेल. कांहीं कारखाने जुने झालेले नसतांना सुद्धां बंद करावे लागल्याची उदाहरणें आहेत. अशा उदाहरणांत कारभाराचा गैरशिस्तपणा हें कारण आढळून आलें आहे.

---

## रेल्वेना लागणाऱ्या स्लीपर्सचा तुटवडा

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत भारताच्या रेल्वे मार्गावरील वाहतुकीचा ताण खूपच वाढणार आहे. त्या दृष्टीनें रेल्वे-वाहतुकीची पुनर्घटना अमेरिकेच्या साह्यानें करण्यांत येणार आहे. तथापि भारतामधील रेल्वेसमोर एक नवी अडचण उपस्थित झाली आहे. रेल्वेच्या रुळाखालीं घालण्यासाठीं जे स्लीपर्स लागतात त्यांचा पुरवठा पुरेशा प्रमाणांत करतां येत नाहीं असें आढळून आलें आहे. भारतीय रेल्वेना ह्या बाबतींत सल्ला देणाऱ्या अधिकाऱ्यानें गंभीर इषारा दिला आहे. ते म्हणतात कीं, भारतामधील रेल्वे मार्गासाठीं जितके स्लीपर्स लागतात त्यांपैकीं ६० ते ७० टक्के स्लीपर्सच जेमतेम मिळूं शकतात. लाकडी, लोखंडी, पोलादी व सिमेंटचे स्लीपर्सचाहि हिशेब धरील अंदाजांत करण्यांत आला आहे. लाकडी स्लीपर्स मिळविण्यासाठीं सर्व देशभर शोध करण्यांत आला. हैद्राबाद, केरळ, अंदमान, कूर्ग, इत्यादि भागांतून योग्य प्रकारचें लांकूड आजपर्यंत मिळालेलें नव्हतें. ह्याहि भागांत अशा प्रकारच्या लाकडाचा शोध करावा लागला. ह्या बाबतींत नेपाळ व भूतान ह्यांच्याकडून थोडीबहुत मदत झालेली आहे. पण, तरीसुद्धां स्लीपर्सच्या पुरवठ्याची परिस्थिति फारशी आशादायक नाहीं. म्हणून वाहतुकीचा चढा सर्च जमेस धरून सुद्धां ब्रह्मदेश, मलाया, सयाम व ऑस्ट्रेलिआ ह्या देशांच्या कडून कमी पडणारे रेल्वेचे स्लीपर्स मिळविण्याचे प्रयत्न करण्याखेरीज दुसरा मार्ग राहिलेला नाहीं.

तमाम दंतरोगांवर
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## भू-विज्ञानाच्या प्रगतीची पूर्वतयारी

### (१)

### भू-वैज्ञानिक संवत्सर

पहिल्या आंतरराष्ट्रीय ध्रुवीय संवत्सरानंतर ५० वर्षांनी दुसऱ्या ध्रुवीय संवत्सराची योजना करण्यांत आली. परंतु, त्यानंतरच्या भू-विज्ञानाच्या प्रगतीमुळें पहिल्या ध्रुवीय शताब्दीपर्यंत न थांबतां तिसरें ध्रुवीय संवत्सर १९५७-५८ मध्येंच आखण्यांत यावें असें ठरलें. सुप्रसिद्ध ब्रिटिश शास्त्रज्ञ, सिड्नी चॅपमन् ह्यांच्या अध्यक्षतेखाली त्यासाठी एक आंतरराष्ट्रीय समिति नेमण्यांत आली. आंतरराष्ट्रीय ध्रुवीय संवत्सराऐवजीं आंतरराष्ट्रीय भू-वैज्ञानिक संवत्सर असें नांव ह्या उपक्रमास देण्याचें ठरलें. कारण ह्या संवत्सरांतील पहाणी व संशोधन उत्तर किंवा दक्षिण ध्रुवापुरतीच मर्यादित राखण्याची नसून सबंध पृथ्वीचा व तिच्या भोंवतालच्या वातावरणाचा त्यांत समावेश व्हावयाचा आहे. संशोधनाचा कार्यक्रम चौदा प्रमुख गटांत विभागण्यांत आला आहे. जे प्रश्न सोडविण्यास आंतरराष्ट्रीय सहकार्याचीच आवश्यकता आहे, अशा प्रश्नांसच ह्या कार्यक्रमांत प्राधान्य देण्यांत आलें आहे. त्याचप्रमाणें, ज्या प्रश्नांचा उलगडा लवकर होण्याची आवश्यकता आहे, अशांकडेच विशेष लक्ष केंद्रित केलें जाणार आहे; पुढेंमागें उपयोगी पडण्याच्या दृष्टीनें सर्व-सामान्य माहिती गोळा करण्याला दुय्यम स्थान आहे.

### अमेरिका-रशिया ह्यांचे कार्यक्रम

प्रस्तुत संवत्सरांत, सबंध पृथ्वीवरील सुमारें १,००० ठिकाणचीं केंद्रें पाहणीचें काम करतील; इतरहि प्रकारचीं केंद्रें जरूरीप्रमाणें उभारलीं जातील. ह्या कामीं फार मोठ्या प्रमाणावर सहकार्य मिळविण्यांत आलें आहे. विमानांचे व आगबोटींचे सारथी हवामानविषयक माहिती सूचनेप्रमाणें गोळा करतील; कॅमेरे, टेलिस्कोप, रॉकेट्स, सॅटेलाइट्स, सिसमोग्राफ्स, स्पेक्ट्रोग्राफ्स, राडार, इत्यादींचा त्या कामीं उपयोग करण्यांत येईल. अंतराळांत उंच ठिकाणीं, तर सागरांत अत्यंत खोल ठिकाणीं पाहणी केली जाईल. ह्या सर्व कार्यक्रमास १०० कोटींच्यावर रुपये खर्च येईल. तो वेगवेगळीं राष्ट्रें वांटून घेतील. ७० सहकारी राष्ट्रांपैकी अमेरिका व रशिआ ह्यांचे कार्यक्रम फारच मोठे आहेत. प्रत्येक राष्ट्र आपला स्वतःचा कार्यक्रम स्वतःच पार पाडील, तो पूर्वनियोजित जागतिक कार्यक्रमाचा एक भाग असेल, आणि जमा केलेली माहिती सर्व राष्ट्रांना उपलब्ध करून दिली जाईल.

### नोंदीचीं छोटीं कार्डें

जिनीव्हा येथील 'वर्ल्ड मिटिऑरॉजिकल ऑर्गनायझेशन' ची मध्यवर्ती कचेरी संवत्सरांतील १८ महिन्यांत जमविलेली हवामान-विषयक माहिती संकलित करून सर्व सभासद राष्ट्रांना पुरविण्याचें काम करील. ह्या संघटनेच्या सर्व सभासद राष्ट्रांतील २,००० केंद्रांतून जमा झालेली माहिती मायक्रो-ओपेक कार्डावर नोंदली जाईल. हें कार्ड पोस्टकार्डाच्या लांबी-रुंदीचें असून त्यावर २० ते ८० पृष्ठें मजकुराचे फोटो वीसपटीनें लहान करून छापण्यांत येतील. अशा रीतीनें एकाच वेळीं २,००० केंद्रांनीं जमा केलेली माहिती एका छोट्या कार्डावर एकत्रित येईल.

### मनुष्यनिर्मित 'चंद्र'

"मनुष्यनिर्मित चंद्र" ही आंतरराष्ट्रीय भू-वैज्ञानिक संवत्सरांतील एक नाट्यपूर्ण घटना होईल. ह्या 'चंद्रा' पैकी एक 'चंद्र' रॉकेटमधून तीन टप्प्यांतून तिकांड्या अग्निबाणांतून सोडण्यांत येईल. पहिल्या रॉकेटनें हा 'चंद्र' आकाशांत ४० मैल उंच पाठविला जाईल. तो तेथें पोंचण्याला दोन मिनिटें लागतील. ह्या रॉकेटची प्रेरकशक्ति संपतांच त्यांतील दुसऱ्या रॉकेटला एका स्फोटानें चालना मिळेल. त्यांतील तिसऱ्या रॉकेटनें 'चंद्र' फेकला जाईल. हा 'चंद्र' २० इंच व्यासाचा व २२ पौंड वजनाचा असेल. पृथ्वीच्या भोंवतीं ३०० मैल उंचीवरून ताशीं १८,००० मैल ह्या वेगानें तो फिरेल. म्हणजे, सुमारें ९० मिनिटांत तो पृथ्वीप्रदक्षिणा करील. अशा रीतीनें पृथ्वीच्या अगदीं लगतच्या वातावरणाबाहेरील प्रदेशांत प्रवेश मिळून तेथील उपयुक्त घटनांची नोंद होऊं शकेल.

### भू-विज्ञानाची प्रगति

कोलंबस, मॅगेलान, इत्यादींनी पृथ्वीवरील नवे नवे प्रदेश शोधून काढून मनुष्याच्या ज्ञानांत भर घातली. त्याचप्रमाणेंच आतां भू-वैज्ञानिकहि पृथ्वीच्या पृष्ठभागाविषयीं अधिक ज्ञान संपादन करूं पाहात आहेत. तथापि, त्यांची मुख्य तळमळ वरच्या वातावरणांत काय चालतें, पृथ्वीच्या पोटांत काय काय घडामोडी होत आहेत, समुद्राच्या पाण्यांत काय काय हालचाली चालू आहेत हें समजून घेण्याची आहे. वारे, समुद्रांतील पाण्याचे प्रवाह, धरणीकंप, सूर्यप्रकाशांतील शक्ति, कॉस्मिक किरण, ध्रुवप्रकाश, इत्यादि घटनांचीं कारणें त्यांना शोधून काढावयाचीं आहेत. थोडक्यांत म्हणजे पृथ्वीवरील वातावरणाची अवस्था ठरविणाऱ्या घटनांचा त्यांना अभ्यास करावयाचा आहे. त्यासाठी केवढी तरी प्रचंड पूर्वतयारी गेल्या सात वर्षांपासून करण्यांत आली आहे. ह्या संशोधनामुळें कितीतरी नवीं दालनें खुलीं होणार आहेत. गेल्या ३०-४० वर्षांत अणुविषयक विज्ञानानें जशी प्रगति केली, तशीच प्रगति भू-विज्ञानांत आतां होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यांत येत आहे.

—श्री. वा. काळे,
"केसरी," ३०-६-५७

---

### १९५६ मध्यें मोटारींच्या उत्पादनांत ४० टक्के वाढ

१९५५ शीं तुलना करतां १९५६ मध्यें भारतांतील मोटारींच्या उत्पादनांत सुमारें ४० टक्के वाढ झाली आहे. १९५६ मध्यें एकूण ३२,१३८ गाड्या तयार करण्यांत आल्या. १९५५ चा हा आंकडा २३,०८४ होता. टॅरिफ कमिशनच्या शिफारशीनुसार १९५३ मध्यें देशी गाड्या व ट्रक्स् यांच्या उत्पादनास प्रारंभ झाल्यापासून, भारतांतील गाड्यांच्या उत्पादनांत सतत वाढ होत आहे. १९५३ व १९५४ मधील उत्पादनाचे आंकडे १३,९२६ व १४,४६२ असे आहेत.

१९५६ मधील मोटारींच्या उत्पादनांचा तपशील असा आहे:- मोटारगाड्या, १२,९८९, स्टेशन वॅगन्स ६७७, जीपगाड्या व तत्सम वाहनें ४३२८ व ट्रक्स् १४,१४४.

भारतांत मोटारगाड्या व ट्रक्स् यांच्या मागणींतहि वाढ होत आहे. १९५४ मध्यें १३,८१३ गाड्यांची विक्री झाली होती. १९५५ व १९५६ मध्यें ती अनुक्रमें २६,०६५ व ३१,४८६ वर गेली. १९६०-६१ पर्यंत मोटारगाड्या व ट्रक्स् यांसाठी मागणी दरवर्षी ६५,००० पर्यंत जाईल असा अंदाज आहे.

मोटारगाड्यांचें उत्पादन करणाऱ्या सरकारमान्य अशा ६ कारखान्यांची उत्पादनशक्ति प्रतिवर्षी ४९,८०० आहे, या धंद्यांत एकूण १७.३ कोटी रुपये भांडवल गुंतविण्यांत आलें असून, त्यांत सुमारें १०,३०० लोकांस काम आहे.

### मद्रास राज्यांतील साखरेचे कारखाने

मद्रास राज्याच्या विधान सभेंत राज्याचे उद्योगमंत्री श्री. वेंकटरमण यांनीं सरकारच्या साखर कारखान्यांच्या बाबतींतील धोरणाविषयीं माहिती सांगितली. एका प्रश्नाला उत्तर देतांना ते म्हणाले कीं राज्यांत ६ नवीन साखर कारखाने काढण्याचे परवाने देण्यांत आलेले आहेत. ह्या सर्व कारखान्यांची मिळून ऊंस गाळण्याची रोजची शक्ति सुमारें ५,१०० टन असेल. त्याशिवाय दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या काळांत राज्यांत आणखी तीन साखरेचे कारखाने काढण्याचा विचार चालू आहे. हे तीन कारखाने मिळून रोज २,४०० टन ऊंस गाळूं शकतील. मद्रास राज्यांत सध्यां ४ साखरेचे कारखाने प्रत्यक्ष उत्पादनाचें कार्य करीत आहेत. ते रोज ४,२०० टन ऊंस गाळतात. ह्या चालू कारखान्यांनीं १९५५-५६ च्या हंगामांत सुमारें ५३,००० टन साखरेचें उत्पादन केलें. राज्यसरकारचा असा हेतु आहे कीं, राज्यांत दरसाल १,४०,००० टन साखरेचें उत्पादन करण्यांत यावें. हें उद्दिष्ट पूर्ण करण्यांत आलें तर राज्याची साखरेची गरज भागविली जाऊन कांहीं थोडी साखर निर्यातीसाठीहि उरूं शकेल. भारताच्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत सर्व देशासाठी म्हणून दरसाल २५ लाख टन साखरेच्या उत्पादनाचें उद्दिष्ट ठरविण्यांत आलें आहे. प्रत्येक राज्यासाठी वेगळें उद्दिष्ट मात्र निर्दिष्ट करण्यांत आलेलें नाहीं. नव्या सहा कारखान्यांपैकी तीन साखर कारखाने सहकारी तत्त्वावर चालविण्यांत येणार आहेत. बाकीचे तीन कारखाने खाजगी मालकीच्या कंपन्यांकडून काढण्यांत येणार आहेत.

---

### बर्लिनमध्यें 'काबुलीवाल्या'चें कौतुक

गेल्या महिन्यांत बर्लिनमध्यें पश्चिम जर्मनीच्या सरकारनें एक चित्रपट महोत्सव साजरा केला. हा समारंभ साजरा करण्याच्या कामीं जर्मनीच्या चित्रपटव्यवसायानेंहि हातभार लावला होता. ४२ राष्ट्रांनीं आपआपल्या कलाकृती स्पर्धेसाठीं धाडल्या होत्या. त्यांत ३२ पूर्ण चित्रपट होते, ६ दीर्घ अनुबोधक होते आणि ५८ लघुपट होते. सिनेमाच्या धंद्यांतील प्रमुख व्यक्तींचा परस्पर परिचय घडवून आणण्याचाहि उत्सवाच्या चालकांचा एक हेतु होता. बर्लिनमध्यें भरलेला हा सातवा आंतरराष्ट्रीय चित्रपट-महोत्सव आहे. १९५६ सालचा उत्कृष्ट चित्रपट म्हणून राष्ट्रपतींचें सुवर्णपदक मिळालेला 'काबुलीवाला' हा चित्रपट भारतातर्फे दाखविण्यांत आला. ही बंगाली कलाकृति पाहून झाल्यावर सिनेमागृहांत जमलेल्या जर्मन प्रेक्षकांनीं टाळ्या वाजवून तिचें मनापासून कौतुक केलें त्यानंतर चित्रपटाचा दिग्दर्शक, निर्माता व नटवर्ग ह्या सर्वांना रंगभूमीवर आणण्यांत आलें. त्यांनाहि प्रेक्षकांनीं अभिवादन केलें. कांहीं जर्मन वितरकांनीं व निर्मात्यांनीं असें मत व्यक्त केलें आहे कीं, हा चित्रपट पश्चिम युरोपमध्यें अतिशय लोकप्रिय होईल. अशा प्रकारच्या हिंदी चित्रपटांना युरोपमध्यें चांगली बाजारपेठ मिळेल असें त्यांचें मत झालें. 'काबुलीवाला' चित्रपटाबद्दल जर्मन वृत्तपत्रांतूनहि स्तुतिपर लेख आले. महोत्सवांत देण्यांत येणाऱ्या पारितोषिकांपैकी एक बक्षिस 'काबुलीवाला' ह्या चित्रपटास मिळण्याची बरीच शक्यता आहे.

---

**चंदनाच्या ओंडक्याची किंमत**—म्हैसूर सरकारच्या जंगल खात्यानें चंदनाच्या ओंडक्यांची विक्री केली. सर्वांत मोठा ओंडका ९ फूट लांबीचा व १४.२ फूट घेराचा होता. त्याची किंमत दर घनफुटाला १६५ रुपये ह्या दरानें १८,६४५ रुपये आली.


## पुणें सेंट्रल
## को-ऑपरेटिव्ह बँक लि.

लक्ष्मी रोड, पुणें शहर.

स्थापना : ४ सप्टेंबर, १९१७

दिनांक १ जानेवारी १९५७ पासून कायम ठेवीचे व्याजाचे दर वाढविले आहेत.

| मुदत | पूर्वीचा दर | नवा दर |
|---|---|---|
| १ वर्ष | २ | $२\frac{1}{2}$ टक्के |
| २ वर्षें | $२\frac{1}{2}$ | $२\frac{3}{4}$ टक्के |
| ३ वर्षें | — | ३ टक्के |
| ५ वर्षें | ३ | $३\frac{1}{2}$ टक्के |
| १० वर्षें | ४ | ४ टक्के |


या बँकेंतील ठेवी मुख्यतः सहकारी शेतकी सोसायट्यांना भांडवलाचा पुरवठा करण्यासाठींच वापरल्या जातात.

अधिक माहिती पत्रद्वारें अगर समक्ष आनंदानें पुरवूं.

वा. ग. आळतेकर
मॅनेजिंग डायरेक्टर.

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय. विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.

**कण आणि क्षण**
( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )
लेखक : – श्री. वा. काळे, संपादक, " अर्थ "
मराठी दुसरी आवृत्ति ] [ किं. १ रु. ८ आ.



किर्लोस्कर
अिलेक्ट्रिक पंपिंग सेट
यांत्रिक दृष्ट्या परिपूर्ण व दीर्घकाल टिकाऊ.
आपल्या शिवारांची जोपासना करण्यासाठीं एकमेव साधन म्हणजेच किर्लोस्कर पंपिंगसेट. भारतांत सर्वत्र समाधानकारकरित्या काम करीत आहेत.
सविस्तर माहितीसाठीं लिहा.
किर्लोस्कर ब्रदर्स लि. किर्लोस्करवाडी, द. सातारा

## व्यवसायधंद्यांतील यशाचें रहस्य

### निबंधांना ५० रु. चीं बक्षिसें

विशाल महाराष्ट्रांत उद्योगधंदे व व्यापार यांसंबधीं रुचि व आस्था वाढावी म्हणून पॅरॅमाऊन्ट उद्योग-व्यापार वार्षिकाचे चार खंड आतांपर्यंत प्रसिद्ध झाले असून ५ व्या खंडाची छपाई सुरू आहे. या उद्देशांना धरून वार्षिकानें पूर्वी तीन वर्षे प्रस्तुत क्षेत्रांतील विविध प्रश्नांवर लेखांच्या स्पर्धा ठेवून त्या यशस्वी केल्या. या प्रथेला अनुसरून यंदांहि स्पर्धा ठेवली आहे.

स्वतंत्र व्यवसाय, उद्योगधंदे व व्यापार या प्रत्येकास विशिष्ट ज्ञान, तंत्र, धोरण व हातोटी, यांचा उपयोग केल्याशिवाय यश मिळण्यास अवघड होतें. यासाठीं यश मिळविलेल्या वरील व्यावसायिकांनीं आपापल्या "व्यवसायधंद्यांतील यशाचें रहस्य" लेखरूपानें आमचेकडे धाडावें. लेखांत सुरुवातीच्या अडचणी, भांडवल, भरभराटीचें मर्म, इत्यादींचा परामर्ष घेऊन त्या धंद्यांत नव्यानें पडूं इच्छिणाऱ्यांना अनुभवाचा फायदा मिळावा. यासाठी अमुक व्यवसाय प्रतिष्ठित व अमुक क्षुद्र, असें समजलें जाणार नाहीं. प्रामाणिकपणें अर्थार्जन ज्या उद्योगांत चांगल्या तऱ्हेनें होईल, त्याबद्दल अनुभव हवे आहेत.

परीक्षासमितीला योग्य वाटतील त्या निबंधलेखकांत निर्णयाप्रमाणें रु. ५० (पन्नास) ही रक्कम विभागली जाईल. या लेखांना उद्योग-व्यापार वार्षिकांत प्रसिद्धि मिळेल. बक्षिस न मिळालेल्या पण ग्रंथांत समावेश केलेल्या निबंधांच्या लेखकांना पुस्तक विनामूल्य मिळेल. लेखाचा व्याप ६०० शब्दांचे आंत राहावा. एका बाजूस लिहिलेल्या वरील मजकुराचे लेख आमचे हातीं ३१ जुलै सन १९५७ चे आंत यावयास हवेत. स्पर्धेबाबत संपादकांचा निर्णय अखेरचा राहील, असें श्री ना. तु. ठाकूर, संपादक, पॅरॅमाऊन्ट उद्योग-व्यापार वार्षिक, ४८१ शनिवार, पुणें २, हे कळवितात.

## पुण्यांत सहकारी छापखाना काढा

अहमदनगर जिल्ह्यांत श्रीरामपूर नजीक सहकारी तत्त्वावर एक मुद्रणालय निघणार असल्याबद्दलची वार्ता नुकतीच एका दैनिकांत प्रसिद्ध झाली आहे. आपल्या पुणें जिल्ह्यांत लहानमोठ्या अनेक सहकारी संस्था आज कार्य करीत आहेत व नवीन साखर कारखाने निघत आहेत. या सर्व संस्थांना दरवर्षी हजारों रुपये छपाईसाठी खर्च येतो.

विशेषतः पुणें जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेस तर छपाईसाठी बराच खर्च येतो. ही गोष्ट विचारांत घेऊन जिल्हा सहकारी बँकेनें या कामीं पुढाकार घेऊन पुण्यांत एक सहकारी तत्त्वावर 'सहकार मुद्रणालय' काढण्याची योजना हातीं घेतल्यास त्यामुळें जिल्ह्यांतील सर्व सहकारी संस्थांचीं छपाईची कामें हें मुद्रणालय हातीं घेऊं शकेल. मुद्रणालय काढण्यांत पुढाकार घेणाऱ्या संस्थांनीं व व्यक्तींनीं प्रथम जास्त शेअर्स घेतल्यास ही योजना मूर्तस्वरूपांत येण्यास वेळ लागणार नाहीं व त्यामुळें जिल्ह्यांतील सहकारी संस्थांना छपाईचा खर्च कमी होईल. सदर योजनेचा पुणें जिल्हा मध्यवर्ती बँक व नामवंत सहकारी कार्यकर्ते विचार करतील काय?

ज. वा. फडके,
एक सहकार प्रेमी

## सारस्वत को. बँक लि.

वरील बँकेस ३० जून, १९५७ अखेर संपलेल्या वर्षी ९३,८१९ रु. नफा झाला. भागीदारांना ६½% डिव्हिडंड मिळेल. बँकेचें खेळतें भांडवल १ कोटि, ७७ लक्ष रुपयांवर गेलें आहे.

## सुरतच्या सहकारी बँकरचा मृत्यु

सुरत पीपल्स को. बँकेचे संस्थापक व सहकारी कार्यकर्ते श्री. व्हीं. सी. जाधव, हे ७२ व्या वर्षी नुकतेच मरण पावले.


दि

## बॉंबे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड

## नोटीस

नोटीस देण्यांत येते कीं, बँकेच्या भागीदारांची विशेष साधारण सभा बँकेच्या नोंदलेल्या कचेरींत, ९ बँक हाउस लेन, कोट, मुंबई येथें, शनिवार दि. २० जुलै १९५७ दिवशीं दुपारीं २ वाजतां (स्टॅ. टा.) खालील कामें करण्यासाठी भरेल:

१. बँकेच्या बाय-लॉजच्या दुरुस्त्यांचा विचार करणें व योग्य वाटल्यास त्या मंजूर करणें.

दुरुस्त्यांचा मसुदा भागीदारांचेकडे स्वतंत्रपणें पाठविण्यांत आला आहे.

मुंबई,
६ जुलै, १९५७

बोर्डाच्या हुकुमावरून
वाय. बी. गायतोंडे
मॅनेजर


## CO-OPERATION & ACCOUNTANCY DIPLOMA BOARD, POONA

*Result of Government Diploma in Co-operation and Accountancy Examination held in April, 1957, at Poona.*

Passed in the whole Examination including those who have passed in one or the other part previously.

**I Class.**

Godbole V. K.

**II Class.**

Athawale M. N., Bhanu M. P., Mahajani B. G., Pathak K. M.

**Pass Class.**

Savant S. D., Bhole D. S., Bhorkar U. K., Dabadge C. A., Gadekar M. F., Gharpure S. M., Gujar G. P., Hosamath G. M., Kalaskar D. R., Kallapur K. S., Kanagali S. I., Patel R. A., Patil N. S., Patil S. B., Quanungo N. H., Rakkasagi D. I., Sadari S. G., Salunkhe S. R., Sathe V. M., Taylor K. D., Vaidya M. B., Bidikar I. M., Deshmukh C. M., Kale V. Y., Patel C. G., Patwardhan G. P., Sonar S. S., Telang V. M.

**Passed in "Co-operation" Group only.**

Kumbhare B. V., Oka P. S., Dalvi I. A. R., Doshi V. H., Rana R. T., Sathe B. V., Shaikh A. M., Shirwalkar R. L.

**Passed in "Accountancy" Group only.**

Kanade A. R., Kulkarni P. V., Pathakji D. S., Patki C. S., Phadke Indumati D., Zingade T. S., Amritkar N. S., Chandgadkar V. S., Date D. R., Deshpande R. M., Desurkar N. A., Dixit S. C., Gajare B. S., Nagarkar M. R., Naik B. A., Pathak B. J., Shah C. A.

**A. C. Shaikh,**
Registrar of Co-operative Societies,
Bombay State, Poona, and
Chairman, Co-operation & Accountancy,
Diploma Board, Poona-1.

## अमेरिकेंतील विजेचा खप वाढत जाणार

अमेरिका हें राष्ट्र यांत्रिक प्रगतीच्या दृष्टीनें पहिल्या प्रतीचें मानण्यांत येतें. कोणत्याहि देशाच्या यांत्रिक प्रगतीविषयीं विचार करतांना त्या देशांतील विजेच्या व इतर प्रकारच्या शक्तीचा खप हें एक महत्त्वाचें प्रमाण धरलें जातें. आजची अमेरिका विजेच्या खपाच्या दृष्टीनें अग्रेसर आहेच. पण, येत्या कांहीं वर्षांत अमेरिकेंतील विजेचा खप खूपच वाढणार आहे असा अंदाज करण्यांत आला आहे. पहिली गोष्ट अशी कीं, अमेरिकेची लोकसंख्या वाढत आहे. सध्यां अमेरिकेची लोकसंख्या १७ कोटीच्या आसपास आहे, ती १९६६ च्या सुमारास २० कोटीच्या घरांत जाईल. अमेरिकन लोकांचें रहाणीचें मान उच्च दर्जाचें असल्यानें लोकसंख्येच्या वाढीबरोबरच सुखी जीवनास लागणाऱ्या वस्तूंची मागणीहि वाढणार हें उघडच आहे. रेडिओ, टेलिफोन, मोटार, टेलिव्हिजन, रेफ्रिजेरेटर, अशा कितीतरी वस्तू अगदी गरजेच्या म्हणून अमेरिकेंत मानल्या जातात हें लक्षांत ठेवलें पाहिजे. अर्थातच विजेचा खपहि वाढणें अपरिहार्य आहे. आणखी २० वर्षांनीं तर अमेरिकेची लोकसंख्या २३ कोटींच्या आसपास असेल. आज अमेरिकेंत सुमारें ४.९६ कोटी कुटुंबें आहेत. त्यांची संख्या १९७० च्या सुमारास ६.९२ कोटीपर्यंत जाईल असा हिशोब करण्यांत आला आहे. विजेच्या साह्यानें उपलब्ध होऊं शकणाऱ्या सुखसोयींचा उपभोग अधिकाधिक अमेरिकन करूं लागतील हें स्पष्टच आहे.

विजेच्या खपाच्या भवितव्याचा विचार करतांना ह्या विषयींच्या तज्ज्ञांनीं कांहीं अंदाज बसविले आहेत. (१) १९७० च्या सुमारास अमेरिकेंतील कुटुंबें दर वर्षास सुमारें ८,००० किलोवॅट वीज वापरूं लागतील. आज त्यांना दरसाल ३,००० किलोवॅट वीज पुरते. (२) पुढील १० वर्षांत कारखान्यांकडून मागणी येणाऱ्या विजेंत दुप्पट वाढ होईल. (३) त्याचप्रमाणें दुकानें, वखारी, कचेऱ्या, इत्यादि ठिकाणीं होणाऱ्या विजेच्या खपांतहि दुप्पट वाढ होईल. अर्थातच विजेचें उत्पादन, तिची विक्री आणि त्यापासून होणारें उत्पन्न ह्यांना फार मोठा वाव आहे. अमेरिकेंतील विजेचें उत्पादन मुख्यतः खाजगी भागीदारांच्या मालकीच्या कंपन्यांकडून होतें. विजेच्या एकूण उत्पादनापैकी ९१ टक्के वीज ह्या कंपन्याच निर्माण करतात. म्हणून विजेची वाढती मागणी भागविण्यासाठीं कंपन्यांना आपल्या कारखान्यांचा विस्तार करावा लागेल. अमेरिकेंतील वीजकंपन्या येत्या १० वर्षांत आपली उत्पादनक्षमता दुप्पटीनें वाढविण्याच्या योजना तयार करीत आहेत. त्याचबरोबर विजेचे आणखी मोठे जनरेटर्स वापरण्यामुळें आणि विजेच्या कारखान्यांचें अधिकाधिक यांत्रिकीकरण केल्यानेंहि विजेच्या उत्पादनाच्या खर्चांत बचत होऊं लागली आहे. विजेचें वाहन करण्यासाठीं ज्या तारा घालतात, त्या घालण्याच्या पद्धतींतहि बदल करण्यांत येत आहे. ह्या सर्वांमुळें ग्राहकाला वीज स्वस्त दरानें मिळूं लागून ती अधिकाधिक वापरली जाईल अशी अपेक्षा आहे.

केवळ वाढत्या लोकसंख्येचा उपयोग नाहीं; रहाणीचें मान उच्च दर्जाचें असेल तरच सुखी जीवनास आवश्यक वस्तूंची मागणी प्रमाणशीर वाढतें, हें लक्षांत घेणें आवश्यक आहे. ह्या दृष्टीनें, भारताची बाजारपेठ कितीतरी मोठी होऊं शकेल व कितीतरी नव्या उपक्रमास येथें वाव मिळूं शकेल.

**पाकिस्तानला अमेरिकेचा गहूं**—अमेरिकेजवळील शिलकी गव्हाच्या सांठ्यापैकीं ३.० लाख टन गहूं विकत घेण्याची खटपट पाकिस्तानचें सरकार करीत आहे. गव्हाची किंमत डॉलर्समध्यें देण्यांत यावयाची असून नंतर तीच रकम अमेरिका पाकिस्तानला कर्जाऊ म्हणून देणार आहे. दीर्घ मुदतीचीं विकास योजनांचीं कामें करण्यासाठीं तिचा विनियोग करण्यांत येणार आहे.

**नेपा गिरणीचा वीजपुरवठा**—नेपा नगर येथील कागदाच्या गिरणीला विजेचा पुरवठा करणाऱ्या विद्युत्‌केंद्रांत बिघाड झाला आहे. त्यामुळें गिरणीला करण्यांत येत असलेल्या विजेच्या पुरवठ्यांत कपात करण्यांत आली असून गिरणीचें उत्पादन रोजीं ६५ टनांवरून २० टनापर्यंत खालीं आलें आहे.

**काश्मीरमध्यें लष्करी तळ**—जम्मूच्या पश्चिमेकडील सरहद्दीजवळ पाकिस्ताननें एक मोठा लष्करी तळ बांधण्याची तयारी चालविली आहे असें समजतें. तळासाठीं बऱ्याच खेड्यांतील लागवडी-योग्य जमिनी सरकारनें आपल्या ताब्यांत घेतल्या आहेत.

## THE CO-OPERATIVE TRAINING COLLEGE POONA

*Results of the Examination for the Higher Diploma in Co-operation held in April, 1957.*
*(In order of merit)*

**I Class**

Kayade D. N., Patil U. S., Karnik S. S., Kumbhari H. K., Mahajani B. G., Patil R. R., Bhatt G. G., Karnataki P. L., Bhatt R. H., Joshi V. D., Joshi B. D., Kalghatgi S. H.

**II Class**

Pawar S. J., Gandhe V. S., Patil N. S., Bateriwalla N. G., Oka P. S., Parvatikar K. G., Joshi S. N., Belliraya K. V., Patil G. K., Dholakia C. L., Chaudhari G. M., Bhagwat L. M., Patel V. V., Prajapati S. R., Selot S. K., Argal M. P., Sanikanwar D. C., Kulkarni L. K., Pathak K. M., Trivedi P. G., Barve S. P., Gawande V. N. Chopphel Tassi, Saraf R. R., Hegde G. L., Patel J. P., Athaniker M. L., Akadas R. G., Salvi M. R., Patki C. S.

**Pass Class**

Angadi R. B., Deshpande P. P., Nair K. Krishnan., Mallangoudar N. S., Roy P. K.

**Pass with Exemptions**

Karlekar M. V., Pandya D. C., Bedarkar R. Y., Patel N. R., Bhagat S. R., Mazamudar A. K., Jotly J. T., Karandikar R. P., Mehta V. B., Puranikmath S. R., Dorle D. A.

**Prizes**

| Names of Donors | To whom awarded |
|---|---|
| 1 Bombay State Co-op. Bank Ltd., Bombay (Rs. 100) | D. N. Kayade |
| 2 Bombay State Industrial Co-operative Association Ltd., Bombay. (R. 50). | G. G. Bhatt, P. S. Oka — divided equally |

5, B. J. Road,
Poona—1
Date 28th June, 1957.

**K. R. Kulkarni,**
Offg. Principal and Secretary,
Co-operative Training College Committee.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.